**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAY-JUNE, 2020, VOL- 7/59*

# बी.एड. प्रशिक्षणार्थींची मराठी भाषेतील सृजनशीलता वृध्दिगत करण्यासाठी विकसन कार्यक्रमाची निर्मिती व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**प्रा. मुन वैशाली दिनेश**
*संशोधिका*
**डॉ. मोहन कांबळे**
*मार्गदर्शक , आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय एरंडवणा,*
*पुणे – ४*

**Abstract**

*प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रामीण भागातील बी.एड. प्रशिक्षण घेणारे ४० प्रशिक्षणार्थींना म.बा.कुडंले यांची भाषिक सृजनशीलतेची कसोटी सोडविण्यास दिली. त्यानंतर ५ दिवसांचा कृतिकार्यक्रम राबविला. परत तीच चाचणी सोडविण्यास दिली. दोन्ही चाचणीचे मध्यमान, प्रमाणविचलन, टी परिक्षिका या साधनांद्वारे परिणामकारकतेचा अभ्यास केला.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना (Introducation)

भाषा शक्ती ही मानवाला लाभलेली एक अधिक व विशेष प्रकारची सहज प्रवृत्ती होय. असे म्हटले जाते. या शक्तीच्या सहाय्यानेच मनुष्याने नैसर्गिक अडचणींवर मात करून जीवन संघर्षात विजयी होवून प्रत्येक क्षेत्रात आपला विकास करून घेतला आहे. आपले जीवन सुखी संपन्न व समृध्द करून घेतले आहे. विचारशक्ती, बुध्दिमत्ता, सामाजिकता, सुसंस्कृतपणा इत्यादी त्यांच्या सर्व गुणविशेषांचा आधार त्यांची भाषा शक्ती हाच होय. विद्येप्रमाणेच भाषेनेच मनुष्याला श्रेष्ठत्व या जगामाजी असे म्हटले तर ते मुळीच चुक ठरणार नाही. भाषेमुळेच नवनिर्मिती साध्य होते. दैनंदिन जीवनामध्ये शाळेच्या ठराविक वेळेमध्ये किंवा तासिकांमध्ये नवनिर्मिती करून घेणे शक्य नाही. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना नवनिर्मितीसाठी निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा या स्पर्धांमध्ये भाग घेवून बक्षीसेही मिळवितात. ज्या मुलांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतला नाही त्यांच्याकडून नवनिर्मिती होत नाही. शाळेमध्ये अपुऱ्या कालावधीत नवनिर्मिती करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातातच असे नाही. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपक्रम राबविण्यासाठी व त्यातून नवनिर्मिती होण्यासाठी शिक्षकाची तयारी उदासीन असते. अश्याप्रकारच्या समस्या संशोधिकेला भेडसाविल्या. म्हणून बी. एड. प्रशिक्षणार्थींची भाषिक सृजनशीलता विकसित केली तर विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीत भर पडेल.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

या उद्देशाने प्रशिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करून कृतीकार्यक्रम राबविण्यात आला. त्यातुन संशोधिकेला सृजनशीलता वृध्दिंगत झाल्याचे आढळून आले.

**सैध्दांतिक पार्श्वभूमी (Historical Background) :** प्रस्तुत संशोधन हे सृजनशिलता या मानसशास्त्रातील संज्ञेशी संबंधित आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मते सृजनशिलता हे केवळ नवनिर्मितीपूर्ती मर्यादित प्रक्रिया नसून ती एक जीवनव्यापी प्रक्रिया आहे हे आपणाला सृजनशीलतेच्या बाबतीत सैधांतिक पार्श्वभूमीतून विविध मानसतंज्ञाच्या मतांनुसार पुढील प्रमाणे मांडता येईल.

[१]रोलो मे – यांच्यामते सृजनशिल शक्तीच्या माध्यमातून व्यक्तिला पुरीपूर्ण विकासाची प्रेरणा मिळते तर [२]कॉर्ल रॉजर्सच्या मते हि एक आत्मविकासाची प्रेरणा आहे. तर अंडरसन यांनी सृजनशीलतेमधील नात्याला महत्व दिले आहे. यांच्या मते सृजनशिल निर्मितीतून व्यक्तिचे अन्य व्यक्तिशी, आप्तस्वकियांसी एक नवे नाते जुळत असते तर मनोविश्लेषणवादी दृष्टीकोनातून [३]फ्राईड यांच्या मते दडपलेल्या वा परिपूर्ण न होवू शकणाऱ्या इच्छा, भावना सांस्कृतिकदृष्टया मान्य वर्तनाद्वारे व्यक्त होणे म्हणजे सृजनशिलता होय. तर [४]थर्स्टनच्या मते – विचार करणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीने एखादी नवीन गोष्ट निर्माण करणे म्हणजे सृजनशीलता होय. तर [५]स्टेनच्या मते – उपलब्ध वस्तू, साहित्य व ज्ञान यांच्या निष्पत्तीतून समूहाला व समाजाला मान्य व उपयुक्त असलेली निर्मिती होय. मानवतावादी मानसशास्त्रज्ञ [६]मॅस्लो यांच्यामते भावना अभिव्यक्तीमधील मुक्तपणा, कल्पना, काळजी, इच्छा इ. वैशिष्टयांचा समावेश सृजनशीलतेशी संबंधित आहे. तर [७]अलफ्रेड बीनेच्या मते बुध्दिमत्तेच्या चाचण्यामधून सृजनशीलतेचा अविष्कार झाला असल्याची दिसून येते. तर [८]गिलफर्ड मते – सृजनशीलता हि एक अशी प्रक्रिया आहे. कि जिच्यामधून नवनिर्मिती घडून येते तर [९]टोरान्स पॉलच्या मते – रूढ आणि मान्यताप्राप्त विचारांमधील किंवा सिध्दान्तांमधील उणीवांची जाणीव होणे, सिध्दान्तांची फेरतपासणी करणे, समस्यांचा शोध घेणे, समस्यांच्या निराकरणासाठी नवनवीन उपाय सुचविणे, ते उपाय तपासून पाहणे. म्हणजे सृजनशीलता.

**सृजनशीलतेचे शैक्षणिक महत्त्व (Importance of Present Study):** सृजनशीलतेच्या संदर्भात देशात आणि विदेशात अनेक संशोधने झाली असून, विशिष्ट घटकाशी सृजनशीलतेचा संबंध धन आहे की ऋण आहे, बोधात्मक आहे की भावनात्मक आहे हे कळण्यासाठी सृजनशीलतेशी संबंधित विविध बाबी वर्षनिहाय पुढीलप्रमाणे –

- कुटूंबाचा आर्थिक दर्जा
- बुध्दिमत्तेचे महत्त्व
- कुटुंबाचे महत्त्व

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- शैक्षणिक संपादन
- पालकांची स्थिती
- सृजनशीलतेचे विकसन
- सांस्कृतिक मागासलेला
- अधिक भाषा असल्याचा परिणाम
- भावनिक संवेदनशीलता
- धन सहसंबंध
- पुरक व मारक घटक
- वर्गातील वातावरण
- मुक्त वातावरणाचा प्रभाव

**संशोधनाची गरज (Research Need) :** आजच्या शिक्षणामध्ये सृजनशीलतेच्या विकासाचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, संगीत, आणि दृश्यकला अशा सर्वच विषयांच्या अध्ययनात सृजनशीलतेचे संवर्धन करण्यासाठी विविध प्रयत्न सातत्याने केले जात आहेत. गिलफोर्ड तर असेही म्हणाले होते की, आता केवळ अवकाशयुग आणि तंत्रज्ञानाचे युग आले म्हणून त्यासंबंधित ज्ञानक्षेत्रातच सृजनशीलता विकसित झाली पाहिजे असे नव्हे तर सामाजिकशास्त्रांच्या क्षेत्रामध्येही सृजनशीलता वाढीस लागली पाहिजे. रॉजर्स यांनी देखील सांस्कृ तिक व शैक्षणिक क्षेत्रातील सृजनशीलतेच्या अभावाविषयी गरज प्रतिपादली आहे. तसेच हॉरेन्स यांनाही या संदर्भात आपला दृष्टिकोन व्यक्त करताना म्हटले आहे की राष्ट्राच्या व्यापक कल्याणासाठी आणि सर्व समाजाच्या मानसिक स्वास्थ्यासाठी लोकांच्या सृजनशील वर्तनाची पातळी उंचावणे गरजेचे आहे. सुप्रसिध्द इतिहासकार टॉयन्बी यांचे मते सृजनशील मनाची थोडी माणसे देखील संस्कृतीवर प्रचंड प्रभाव पाडू शकतात. अनेक विचारवंतांनी तर संपूर्ण मानवजातीला एकत्र आणण्याचे काम सृजनशीलता करू शकते असे सांगितले आहे. ज्ञान आणि सृजनशीलता या दोन्हींची उपासना आपल्याला आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि शांतता याकडे घेऊन जाऊ शकते असे युनेस्कोदेखील आग्रहाने म्हणत आहे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेच्या विकासात शाळा आणि शालेय वातावरण खूप महत्वाची भूमिका बजावू शकते. वर्गाध्यापनामध्ये दैनंदिन तासिकांच्या कालावधीत सुजनशीलतेसाठी पोषक वातावरण निर्माण करणे हे शिक्षकांसाठी अत्यंत आव्हानात्मक आहे आणि यासाठी शिक्षकांना सृजनशीलता वृध्दिंगत करण्यासाठी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**सृजनशीलता विकसनासासाठी पीएचडी स्तरावर झालेली संशोधने**

| अनु.क्र. | संशोधकाचे नाव | विद्यापीठ व वर्ष | संशोधन पध्दत | नमुना | संशोधन साधने | आधारभूत थिअरी | संख्याशास्त्रीय तंत्र | निष्कर्ष | सृजनशीलतेच्या अभ्यासातील फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. हेमलता पारसनीस | पीएच.डी. एसएनडीटी विद्यापीठ १९८४ | प्रायोगिक पध्दत | पुणे शहरातील मराठी भाषा शिकणाऱ्या १०वीचे मुले विद्यार्थीनी | डॉ. ए. डी. ओक बुध्दिमापन चाचणी | PTCT | "t" Test | सृजनशीलतेच्या विकासासाठी प्रशिक्षण दिल्यास १०वीतील विद्यार्थीनीवर परिणामकारक ठरते. | सृजनशीलतेच्या विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रम निर्मिती |
| २. | डॉ. बा. म. नंदन पवारे | पीएच.डी. नागपूर विद्यापीठ १९८६ | प्रायोगिक पध्दत | इयत्ता ९वीची मुले समतुल्य गट | न.बा. कुंडले | PTCT | "t" Test | सृजनशील पध्दतीने अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांचे मराठी भाषा प्राविण्य निश्चितपणे वाढू शकते. | सृजनशीलतेच्या विकासासाठी प्रशिक्षण निर्मिती |
| ३. | पटेल जे. पेडू. | पीएच.डी. एम.जी.यु. विद्यापीठ १९८७ | प्रमाणिक पध्दत | इयत्ता ८वी समतुल्य गट | पटेल जे. पेडू. यांची बुध्दिमत्ता चाचणी व सृजनशीलतेची प्रमाणित चाचणी | TTCT | -- | मुलांमधील सृजनशीलता वाढविण्यास बुध्दिमत्ता गुणांकाचा वाटा महत्त्वाचा आहे. | सृजनशीलता व बुध्दिमत्ता विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रम निर्मिती |
| ४. | सुनीता भागवत | एस.एन.डी.टी. विद्यापीठ १९९१ | प्रायोगिक पध्दत | इयत्ता ८वी एकल गट | रेव्हानची बुध्दिमत्ता चाचणी | गिल्फोर्डच्या एस. आय. मॉडेल | "t" Test | सृजनशीलता विकसनानंतर उत्तर चाचणीमध्ये सृजनशीलतेत फरक आढळला | सृजनशीलता विकासाठी प्रशिक्षण कार्यक्रम निर्मिती |
| ५ | नलिनी गुजराथी | एस.एन.डी.टी. विद्यापीठ १९९२ | प्रायोगिक पध्दत | इयत्ता ९वी समतुल्य गट | स्वनिर्मित सृजनशीलता चाचणी | सृजनशीलता प्रकल्प | -- | प्रशिक्षणातून विज्ञानविषयक सृजनशीलता विकसित करता येते | सृजनशीलता विकसन प्रशिक्षण कार्यक्रम प्रयोगप्रकल्प |

## संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Present study)

१. बी.एड. प्रशिक्षणार्थींची भाषिक सृजनशीलता वृध्दिंगत करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करणे.

२. बी.एड. प्रशिक्षणार्थींची भाषिक सृजनशीलता वृध्दिंगत कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

## गृहितक (Assumption)

सुयोग्य कृती कार्यक्रम निर्मिती व त्यांची कार्यवाही केल्यानंतर बी.एड्. प्रशिक्षणार्थ्यींची सृजनशीलतेत वाढ होते (चित्रा सोहनी)

## संशोधन परिकल्पना (Hypothises)

कृती कार्यक्रमामुळे पूर्वकसोटीपेक्षा उत्तर कसोटीत बी.एड्. प्रशिक्षणार्थ्यींची सृजनशीलतेच्या गुणांमध्ये लक्षणीय वाढ दिसून येते.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**प्रस्तुत संशोधनासाठीची पध्दत (Method of Research)**

प्रस्तुत संशोधनात प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला आहे. कारण प्रस्तुत संशोधनामध्ये बी.एड. प्रशिक्षणार्थींची सृजनशीलता विकसन कार्यक्रमाची निर्मिती या स्वतंत्र चलाचा परिणाम सृजनशीलतेतील फरक या आश्रयी चलावर कशा स्वरूपाचा होतो हे अभ्यासण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला आहे.

**माहिती विश्लेषण पध्दत (Method of Information Analysis)**

चाचणीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालील संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग करून केले आहे.

१. मध्यमान २. प्रमाण विचलन ३. **t** परिक्षिका

यांचा उपयोग करून माहितीचे विश्लेषण केले आहे.

**जनसंख्या(Population)**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाची जनसंख्या ही पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील बी.एड. प्रशिक्षणार्थींची संख्या होय.

**नमुनानिवड (Sample)**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रासंगिक नमुना निवड पध्दतीने म्हणजेच जे प्रतिसादक (विद्यार्थी) सहज उपलब्ध होऊ शकतात. अशांचा समावेश यामध्ये केलेला आहे. बी.एड. प्रशिक्षणार्थी एकुण ४० विद्यार्थ्यांचा समावेश नमुना निवडीत केला आहे.

**संशोधनाचे साधन (Research Tool)**

संशोधिकेनी म.बा.कुंडले यांची भाषिक सृजनशीलतेची कसोटी

**निष्कर्ष (Finding)**

प्रस्तुत संशोधनात कृतिकार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या बी.एड. प्रशिक्षणार्थींचाच (४०) संख्याशास्त्रीय विश्लेषणात समावेश केला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये सृजनशीलतेच्या पुर्व कसोटी वरील गुण व उत्तर कसोटीवरील गुण यांच्या टी चे मुल्य १०.७६ या सार्थकता स्तरावर आढळले. म्हणून प्रस्तुत कृतिकार्यक्रमामुळे भाषिक सृजनशीलता वृध्दिंगत करण्यासाठी पाच दिवसांचा कार्यक्रम परिणामकारक आहे.

**संदर्भ**

*डॉ. मधुकर बाळकृष्ण कुडंले, १९७४, 'मराठी अध्यापन' श्री. विद्या प्रकाशन, पुणे.*

*कुंडले, म.बा. 'सर्जनशीलता' नूतन प्रकाशन, पुणे २००८*

*उपासनी ना.के., नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, श्री. विद्या प्रकाशन, पुणे १९८७.*

*गंगाधर वि. कायंदे पाटील, 'शैक्षणिक मानसशास्त्र' चैतन्य पब्लिकेशन्स नाशिक, २००७.*

*Buch M. B . (Editor) A Survey of Research in Education (First)*

*Buch M. B . Second Survey of research in Education (1972-78)*

*Buch M. B . Third Survey of research in Education (1978-83)*

*Buch M. B . Fourth Survey of research in Education (1983-88)*

*Buch M. B . Fifth Survey of research in Education (1992)*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*